Review of ReseaRch
ISSN: 2249-894X
Impact Factor : 5.7631(UIF)
Volume - 12 | Issue - 7 | April - 2023

# १९९० नंतरची महाराष्ट्रातील काँग्रेस संघटना आणि दुफळीवाद

**प्रा. मारुती चांगदेव हजारे**
**संतोष भीमराव पाटील आर्ट्स, कॉमर्स आणि सायन्स महाविद्यालय, मंद्रूप.**

**सारांश :**



महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतरच्या काळामध्ये यशवंतराव चव्हाण यांनी राजकारणात प्रवेश केलेल्या नेते व कार्यकर्त्यांना महाराष्ट्राच्या राजकीय प्रक्रियेत सामावून घेतले. काँग्रेस पक्षाला महाराष्ट्रातील या नेते व कार्यकर्त्यांच्या रूपाने मोठ्या प्रमाणात उर्जामिळाली. काँग्रेस पक्षाची संघटना, शासन,स्थानिक स्वराज्य संस्था आणि सहकारी संस्थांमध्ये नवे नेते व कार्यकर्त्यांनामहत्त्वाच्या जागी काम करण्याची संधी मिळाली.काँग्रेस पक्षाकडे असणाऱ्या सत्ताकेंद्रांची उपलब्धता झाल्यामुळे या नेते व कार्यकर्त्यांना स्वतःच्या राजकीय आशा-आकांक्षा साकार करण्याची संधी मिळाली. काँग्रेस पक्षालादेखील याचा फायदा होऊन काँग्रेस पक्षाचा महाराष्ट्राच्या शहरी व ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात विस्तार झाला. १९३५-३६ पासून काँग्रेस पक्षाने महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात पक्ष संघटना उभी करण्यासाठी प्रयत्न केले. यामुळे १९६० ते १९९० अशी तीन दशके महाराष्ट्राच्या राजकारणात काँग्रेस पक्षाचे वर्चस्व टिकून राहिले. काँग्रेस पक्षाने आपल्याकडे असलेल्या सत्तेच्या माध्यमातून या कालखंडात महाराष्ट्राच्या विकासासाठी विविध योजना अंमलात आणल्या. काँग्रेस पक्षाने सत्ताकाळात केलेल्या विकासकामांमुळेच महाराष्ट्रात काँग्रेस पक्षाचा जनाधार मोठ्या प्रमाणात निर्माण झाला. राज्याचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या काळातकाँग्रेस पक्षाचे राजकारण हे बहुतांशी समाजकारणाला प्राधान्य देणारे, विकासाभिमुख, सचोटीचे आणि मुख्य म्हणजे नैतिकता जोपासणारे होते. यशवंतराव चव्हाण यांनी काँग्रेस पक्षातील अंतर्गत गटबाजी नियंत्रणात ठेवून काँग्रेस पक्षाची संघटना मजबूत केली यामुळे १९९० पर्यंत काँग्रेस पक्षाला महाराष्ट्रात निर्विवाद सत्तादेखील मिळत गेली आणि काँग्रेस पक्षाचा जनाधार देखील कायम राहिला.काँग्रेसमधील गटबाजी सत्ताकेंद्रांच्या उपलब्धतेमुळे काँग्रेसच्या नियंत्रणात राहू शकली.

**सूचक शब्द:** गटबाजी,दुफळीवाद, विकासाभिमुख राजकारण,कृषी-औद्योगिक प्रतिमान, सत्ताकेंद्र,राजकीय आकांक्षा,

## प्रस्तावना :

१९९० पूर्वी काँग्रेस पक्षामध्ये मोठ्या प्रमाणात गटबाजी व दुफळीवाद होता परंतु तो पक्षीय पातळीवरच नियंत्रित केला जात होता. १९९० नंतर मात्र काँग्रेस पक्षामध्ये मोठ्या प्रमाणात गटबाजी वाढलेली पहावयास मिळते. १९९० नंतर महाराष्ट्रातील काँग्रेस पक्ष संघटनेत अनेक स्थित्यंतरे घडून आली आणि त्यामुळेकाँग्रेस पक्षाला पराभवाला सामोरे जावे लागले. सुरुवातीच्या काळात यशवंतराव चव्हाण यांनी काँग्रेस पक्षामध्ये बेरजेचे राजकारण करण्यावर भर दिला. महाराष्ट्राच्या विकासाच्या प्रक्रियेत विविध समाजघटकांना स्थान देण्याचा प्रयत्न केला. काँग्रेस पक्ष संघटनेमध्येदेखील सर्व समाजघटकांना प्रतिनिधित्व मिळेल याची खबरदारी घेतली. यशवंतराव चव्हाण केंद्रामध्ये गेल्यानंतर काँग्रेस पक्षांतर्गत गटबाजीस सुरुवात झाली. १९६९ मधील राष्ट्रीय पातळीवरील काँग्रेस पक्ष संघटनेतील फूटीचा परिणाम म्हणून महाराष्ट्रातील काँग्रेस संघटनेत फूट पडली. १९७० च्या दशकात केंद्रीय नेतृत्वाने महाराष्ट्रातील काँग्रेस पक्ष संघटनेत मोठ्या प्रमाणात हस्तक्षेप करण्यास सुरुवात केली. महाराष्ट्रातील सत्ता चौकट बदलण्याचे प्रयत्न केले. याचा परिणाम काँग्रेस पक्षाच्या संघटनेत शिखरापासून पायापर्यंत मोठा बदल घडून आला. मराठा नेतृत्वाचे खच्चीकरण खूप मोठ्या प्रमाणात झाले परिणामी मराठा नेतृत्वात अंतर्गत स्पर्धा सुरु

झाली. १९७८ मध्ये काँग्रेस पक्षांच्या संघटनेअंतर्गत गटबाजीला ऊत येऊन काँग्रेस पक्षात प्रथमच उघडपणे फूट पडली याचा परिणाम म्हणून १९७८ च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाला पराभवाला सामोरे जावे लागले. पुढे काँग्रेसअंतर्गत गटबाजीवाढतच गेली. या गटबाजीचा परिणाम होऊन काँग्रेस पक्ष संघटना दुबळी बनली. केंद्रीय नेतृत्वाने महाराष्ट्रावर मुख्यमंत्री लादल्याने महाराष्ट्रातील नेतृत्व संघटना व मतदारांमध्ये एक प्रकारची अस्वस्थता निर्माण झाली. १९९९ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या स्थापनेने काँग्रेस पक्षामेध्ये उभी फूट पडली व काँग्रेस पक्षाचे अपरिमित नुकसान झाले काँग्रेस पक्षाचा मतदार दोन पक्षांत विभागला गेल्यामुळे काँग्रेस पक्ष दुबळा होऊन मतांची टक्केवारी व जागा खूपच कमी झाल्या. काँग्रेस पक्षातील नवीन नेतृत्वाची विकास प्रक्रिया, जनाधार कायम ठेवणे, पक्ष संघटना नव्याने बांधणे तसेच पक्ष धोरणाची दिशा ठरविणे या गोष्टींकडे काँग्रेस पक्षाचे दुर्लक्ष झाले यामुळे १९९० नंतर काँग्रेस पक्षाचा मोठ्या प्रमाणात ऱ्हास झाला.

### काँग्रेस पक्षाचे महाराष्ट्राच्या विकासातील योगदान:

महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर काँग्रेस पक्षाने राज्य सरकारच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या विकासासाठी अनेक क्षेत्रात क्रांतिकारी निर्णय घेतले व त्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी धोरणात्मक पाऊले उचलली. शेती विकासासाठी जमीन सुधारणा कायदे केले, जलसिंचनासाठी पाटबंधारे योजना राबविली, महाराष्ट्राचा पायाभूत विकास व्हावा यासाठी रस्ते व वाहतूक व्यवस्थेचा विकास केला, मोठ्या प्रमाणात उद्योधंद्याची उभारणी केली. ग्रामीण व शहरी भागात शिक्षणाचा प्रसार व्हावा यासाठी शिक्षण संस्थांची उभारणी केली तंत्राज्ञानविषयक क्षेत्राच्या विकासासाठी अनेक निर्णय घेतले. या जोडीनेच आर्थिक क्षेत्रात अनेक क्रांतिकारी निर्णय घेतले. शेती व ग्रामीण विकासासाठी सहकारी चळवळीचा पाठपुरावा केला. विविध घटकांना सत्तेमध्ये सामावून घेण्यासाठी सत्तेचे विकेंद्रीकरण केले सर्वसमावेशक अशा धोरणांचा पाठपुरावा केला यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणाला एक नवी दिशा मिळून महाराष्ट्राच्या विकासाला हातभार लागला. शेती, सहकार, शिक्षण, साहित्य, संस्कृती, क्रीडा, रोजगार, उद्योगधंदे, व्यापार, आरोग्य इत्यादी विविध क्षेत्रामध्ये काँग्रेस पक्षाने घेतलेल्या निर्णयामुळे व राबविलेल्या योजनांमुळेमहाराष्ट्राचा मोठ्या प्रमाणात विकास झाला. यामुळे देशाच्या राजकारणात महाराष्ट्र हे एक प्रगत आणि प्रगल्भ राज्य म्हणून पुढे आले महाराष्ट्राचा झालेला विकास देशाच्या राजकारणाला एक नवी दिशा देणारा ठरला. महाराष्ट्राच्या स्थापनेनंतरचा सुरुवातीचा कालखंड हा महाराष्ट्राच्या इतिहासातील सुवर्णकाळ ठरतो. याच काळात काँग्रेस हा महाराष्ट्राच्या राजकारणातील मध्यवर्ती पक्ष बनला. या सुधारणांच्या माध्यमातून काँग्रेस पक्षाने महाराष्ट्रामध्ये आपला पाया मजबूत केला महाराष्ट्राच्या राजकारणात काँग्रेस पक्षाचे स्थान अतिशय वैशिष्ट्यपूर्ण राहिले असल्याचे दिसून येते.

काँग्रेस पक्षाने या काळात महाराष्ट्राच्या विकासासाठी कृषी-औद्योगिक प्रतिमान राबविले. कृषी व औद्योगिक क्षेत्राच्या समतोल विकासासाठी मोठ्या प्रमाणात प्रयत्न केले. कृषी व कृषीआधारित उद्योग तसेच इतर उद्योगधंदे यांच्या विकासासाठी प्रयत्न केले. काँग्रेस पक्षाने राबविलेल्या कृषी-औद्योगिक प्रतिमानामुळे आज महाराष्ट्र कृषी आणि औद्योगिक या दोन्ही क्षेत्रात देशातल्या आघाडीच्या राज्यांमध्ये गणला जातो. पारंपारिक शेतीऐवजी आधुनिक पद्धतीने शेतीचा विकास व्हावा यासाठी काँग्रेस सरकारने कृषी क्षेत्रात मोठ्या प्रमाणात सुधारणा केल्या. त्यासाठी विविध प्रकारचे कायदे केले.काँग्रेस पक्षाचे नेते यशवंतराव चव्हाण यांनी कृषिविषयक सुधारणांमध्ये शेतीच्या मालकीहक्काचा प्रश्न, भूमिहीनांचा प्रश्न व कृषी विकासासाठीचे विविध उपाय यावर अधिक भर दिला. त्यांच्या मते, जमीन कसणारा व्यक्तीच शेतजमिनीचा मालक असावा. त्यांनी सामाजिक समता व सामाजिक न्यायाच्या दृष्टीकोनातून शेतीचा विचार केला. भारतात शेती क्षेत्रात भूमिहीनांची संख्या अधिक आहे म्हणून वाजवीपेक्षा अधिक जमिनी असणाऱ्या लोकांनी त्यांच्या जमिनीच्या एक ते दोन टक्के जमीन भूमिहीनांनाद्यावी असे त्यांचे मत होते तसेच जमीन अविकसित असल्याने ती अनुत्पादक व पडीक राहिली आहे. अशा जमिनी लागवडीखाली आणणे आवश्यक आहे. शेती व्यापारी तत्त्वाने केली पाहिजे. शेतीच्या आधुनिकीकरणाच्या मार्गातील अडथळे दूर केले पाहिजेत. नद्यांच्या पाण्याचा शेतीसाठी वापर केला पाहिजे. नद्यांवर धरणे बांधली पाहिजेत. धरणे बांधल्याने विस्थापित होणाऱ्या लोकांचे पुनर्वसन केले पाहिजे. शेतकऱ्यांनी कृषीशास्त्राचा अभ्यास केला पाहिजे, असे त्यांचे मत होते. जलसिंचनासाठी व उद्योगांसाठी विजेची मोठ्या प्रमाणातील आवश्यकता ओळखून त्यांनी महाराष्ट्रात वीजनिर्मिती प्रकल्प मोठ्या प्रमाणात उभे केले.

कृषीबरोबरच कृषी आधारित उद्योग व इतर उदयोगांचा विकास करण्यासाठी काँग्रेस पक्ष व नेतृत्वाने मोठ्या प्रमाणात प्रयत्न केले. महाराष्ट्राच्या सर्वांगीण औद्योगिक विकासासाठी काँग्रेस सरकारनेराज्यभर औद्योगिक वसाहती स्थापन करण्याची सर्वंकष योजना आखली.ज्यायोगे शहरांपासून दूर ग्रामीण भागातदेखील छोटे कारखाने निघून तेथे रोजगार वाढला. औद्योगिक वसाहती स्थापन करण्याची मूळ कल्पना पंडित नेहरुंनी १९४७मध्ये स्थापन केलेल्या ॲडव्हायजरी प्लानिंग बोर्डाची होती. त्यांनी १९५५मध्ये प्रांतांना औद्योगिक

वसाहती स्थापन करण्याची शिफारस केली. तेव्हा मुख्यमंत्रीयशवंतराव चव्हाण यांचे द्वैभाषिक महाराष्ट्र राज्य आघाडीवर होते. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र राज्य झाल्यावर त्या योजनेत सुधारणा करुन तिचा वेगाने विस्तार केला. मुंबईजवळ ठाणे, पुण्याच्या आसपास आणि कोल्हापूरजवळ शासकीय प्रयत्नाने अशा वसाहती निर्माण केल्याचे दिसून येते. महाराष्ट्रामध्ये उद्योगधंद्यांची शीघ्र व सुव्यवस्थित स्थापना व्हावी तसेच वाढ व्हावी, या हेतूने महाराष्ट्र सरकारच्या माध्यमातून त्यांनीमहाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम१९६१ नुसार १ ऑगस्ट १९६२ रोजी महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाची(एम् आय डी सी) निर्मिती केली. या योजनेप्रमाणे उद्योगांना पुष्कळ सोयी-सवलती मिळाल्या. पुण्याजवळ भोसरी इथे औद्योगिक वसाहत उभारायची होती तेव्हा यशवंतराव चव्हाण यांनी स्वत: जाऊन वसाहतीसाठी जागा निवडली.यशवंतराव चव्हाण हे समतोल विकासाचे पुरस्कर्ते होते म्हणून औद्योगिक क्षेत्रात विकास योजना आखताना अविकसित विभागांचा त्यांनी आधी विचार केला. ग्रामीण भागात औद्योगिकीकरण करण्यासाठी त्यांनीग्रामीण भागात उद्योग सुरू करून शेती आणि उद्योगांची सांगड घातली. शहरी व ग्रामीण अर्थव्यवस्थेची सांगड घालून शहरांकडे धाव घेणारा श्रमिकांचा लोंढा थोपविला. औद्योगिक विकासासाठी त्यांनी महत्त्वपूर्ण नियोजन केले. देशाचा संतुलित आर्थिक विकास व्हावा यासाठीत्यांनी महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासाचा मास्टर प्लान तयार केला. अविकसित भागाच्या विकासासाठी त्यांनी संयुक्त औद्योगिक क्षेत्राची कल्पना मांडली. याशिवाय, राष्ट्राच्या आर्थिक विकासासाठी त्यांनी सहकाराचा पुरस्कार केला. भारतासारख्या कृषिप्रधान देशाच्या विकासासाठी यशवंतराव चव्हाण यांची सहकारी तत्त्वे फार उपयुक्त ठरतात.

## काँग्रेस पक्षातील गटबाजीच्या राजकारणास सुरुवात :

काँग्रेस पक्षाच्या विचारसरणी व कार्यपद्धतीवर सुरुवातीला पंडित जवाहरलाल नेहरूंच्या विचारांचा व कार्याचा प्रभाव होता. पंडित नेहरू यांचे विचार हे स्वातंत्र्य चळवळीतून आकाराला आलेले व देशातील सर्व समाजघटकांचे हित जोपासणारे होते आंतरराष्ट्रीय स्तरावरील सामंजस्य, राष्ट्रीय एकात्मता साधणारा राष्ट्रवाद, सर्वधर्मसमभाव, उदारमतवादी लोकशाही आणि मिश्र अर्थव्यवस्थेच्या माध्यमातून देशाचा विकास करता येऊ शकतो यावर पंडित नेहरूंचा प्रचंड विश्वास होता पंडित जवाहरलाल नेहरू यांच्याकडे काँग्रेस पक्षाची सत्ता असताना पक्षात असा प्रघात होता की, राष्ट्रीय राजकारणाच्या निर्णयप्रक्रियेत घटकराज्यांच्या नेतृत्वाकडून सहभाग घेतला जावा तसेच घटकराज्यांच्या प्रश्नांच्या बाबतीत घटकराज्यांच्या नेतृत्वास काही प्रमाणात स्वायत्तता असावी. पंडित जवाहरलाल नेहरू पंतप्रधान असेपर्यंत या स्वयत्ततेला काँग्रेस पक्षांतर्गत लोकशाहीने वाव दिला पंडित नेहरू यांच्या मृत्युनंतर त्यांचा वारसदार ठरविण्याच्या निर्णय प्रक्रियेत घटकराज्यांच्या मुख्यमंत्र्यांनी महत्वाची भूमिका बजावलीइंदिरा गांधींकडे काँग्रेस पक्षाची सत्ता आल्यानंतर पंतप्रधान पदाचे महत्व अधिक वाढले व राज्यांच्या मुख्यमंत्र्यांना दुय्यम दर्जा प्राप्त झाला

इंदिरा गांधींचे नेतृत्व मानण्याच्या प्रश्नावरून १९६९ मध्ये राष्ट्रीय पातळीवर काँग्रेस पक्षात फूट पडली. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राचा विचार करता स. का. पाटील हे इंदिरा काँग्रेस गटाच्या विरोधात गेले तर यशवंतराव चव्हाण हे इंदिरा काँग्रेस गटाच्या पाठीमागे भक्कमपणे उभे राहिले. याचा महाराष्ट्रातील काँग्रेस पक्षाच्या संघटनेवर फारसा परिणाम झाला नाही. राष्ट्रीय पातळीवर झालेल्या काँग्रेस पक्षाच्या फाटाफुटीत स. का. पाटील वगळता महाराष्ट्रातील काँग्रेस नेतृत्वाने इंदिरा गांधींचे नेतृत्व मान्य केल्याचे दिसून येते.यशवंतराव चव्हाण यांनी निर्माण केलेली महाराष्ट्रातील काँग्रेस वर्चस्वाची चौकट व काँग्रेस सरकार यांनी १९७० पर्यंत एकत्रितपणे वाटचाल केल्याचे दिसून येते. १९७१ च्या लोकसभा निवडणुकीवेळी राष्ट्रीय काँग्रेस पक्षात पडलेल्या फुटीवर मात करण्यात इंदिरा गांधी यशस्वी ठरल्या. काँग्रेस पक्षामधील बहुसंख्य जेष्ठ नेतृत्वाने इंदिरा गांधींचे नेतृत्व मान्य केले असले तरी इंदिरा गांधींनी आपले नेतृत्व मजबूत करण्याच्या दृष्टीकोनातून व भविष्यात आपणास पक्षातून कोणताही विरोध होऊ नये यासाठी अनेक धोरणात्मक निर्णय घेतले

१९७१-७२ पर्यंत इंदिरा गांधींची 'Larger than the life' अशी प्रतिमा निर्माण झालीहोती. त्यांची तुलना भारतीय देवता 'दुर्गा'शी केली जाऊ लागली. १९७० नंतर भारतीय राजकारणात व्यक्तीपूजेस सुरुवात झाली. इंदिरा गांधीनीआपल्या संघटनात्मक राजकारणाचा भाग म्हणून सर्वच घटकराज्यांच्याराजकारणात पर्यायी नेतृत्व उभे केले. यामुळे काँग्रेसमधीलच दुसऱ्या फळीतील नेतृत्वास दुय्यम स्थान प्राप्त होण्यास सुरुवात झाली.त्यांनी आपले नेतृत्व वरचढ बनवताना पक्ष संघटना, शिस्त, प्रादेशिक नेतृत्वाची साखळी या सर्व गोष्टी बाजूला ठेवल्या. त्यांच्या आधीसुद्धा पंडित नेहरू हे मते खेचणारे पक्षाचे महत्त्वाचे नेते होतेआणि त्या अर्थानेकाँग्रेस पक्षात नेतृत्वाचा घटक मध्यवर्ती होताच. पण नेहरूंच्या नेतृत्वाच्या जादूला सर्व राज्यांमध्ये काँग्रेस पक्षाच्या भक्कम संघटनेची जोड होती. इंदिरा गांधींनी आपल्या सत्ताकाळात फक्त स्वतःचे नेतृत्व आणि प्रतिमा यावर जास्त भर दिला.महाराष्ट्र राज्यदेखील यास अपवाद राहिले नसल्याचे दिसून येते.

१९७१-७२नंतर इंदिरा गांधीनी आपल्या संघटनात्मक राजकारणाचा भाग म्हणून महाराष्ट्रातील काँग्रेस पक्षाच्या संघटनेची पुनर्रचना केली.त्यांनीमहाराष्ट्रातील काँग्रेसपक्षाची संघटनात्मक रचना पायापासून शिखरापर्यंत बदलली.यामुळे महाराष्ट्रातील प्रस्थापित मराठा नेत्यांनी इंदिरा गांधींच्या नेतृत्वालामोठ्या प्रमाणात विरोध केला. हा विरोध मोडून काढण्यासाठी इंदिरा गांधीनीमराठा नेतृत्वामध्ये छुपेपणाने राहिलेली महत्वाकांक्षा ओळखून मराठा नेतृत्वामधील अंतर्गत सत्तास्पर्धेला वाव दिला. त्यांनीमहाराष्ट्रातील प्रभावी नेतृत्वास डावलून स्वतःचाकोणताही जनाधार नसलेल्या आपल्या मर्जीतील लोकांना काँग्रेस संघटनेमध्ये व सरकारमध्ये महत्वाची पदे दिली.अशाप्रकारे मराठा नेतृत्वाचे काँग्रेस संघटनेवरील वर्चस्व कमी करण्यासाठी इंदिरा गांधीनी प्रयत्न केले.यातूनच काँग्रेस पक्षामध्ये गटबाजी मोठ्या प्रमाणात वाढीस लागली. महाराष्ट्रामध्ये स्वतःचा समर्थक वर्ग तयार करण्यासाठी इंदिरा गांधीनी नवीन मराठेतर नेतृत्वास पुढे आणले. त्यामुळे महाराष्ट्रातील सत्ताचौकट बदलण्यास सुरुवात झाली. मराठा नेतृत्वाचे काँग्रेस पक्ष संघटनेवरील वर्चस्व कमीझाले. कोणताही जनाधार नसलेल्यानेत्यांना संघटनेमध्ये महत्वाचे स्थान मिळाल्यामुळेसर्वसामान्य लोकांशी काँग्रेस पक्षाची असणारी बांधिलकी नष्ट झाली. काँग्रेस नेतृत्वाचा मतदारांबरोबर असलेला प्रत्यक्ष संवाद नष्ट झाला.तसेच लोकांचा पाठिंबा कमी होत गेला. पक्षश्रेष्ठींना महाराष्ट्रातील काँग्रेस संघटनेमध्ये जेंव्हा जेंव्हा अडथळा आला तेंव्हा पक्षश्रेष्ठींनीच काँग्रेस पक्षाच्या संघटनेवर कुरघोडी केलेली दिसून येते. केंद्रीय पक्ष नेतृत्वाने महाराष्ट्रातील नेतृत्वास कायमच नमती भूमिका घ्यायला लावली. याचा परिणाम म्हणून महाराष्ट्रामध्ये काँग्रेस पक्षात नवीन नेतृत्व स्वतंत्रपणे विकसित होऊ शकले नाही. महाराष्ट्रातील काँग्रेस पक्षाचे नेतृत्व केंद्रीय पक्षश्रेष्ठींकडेच राहिलेले दिसून येते. त्यामुळेमहाराष्ट्रातील काँग्रेस पक्ष संघटनेचे स्वरूप अस्ताव्यस्त झाले. काँग्रेस पक्षाची संघटना कमकुवत होत गेली. १९९० नंतरकाँग्रेस पक्षाची तात्विक विचारसरणी राज्यातील पक्षाच्या कार्यकर्त्यांपर्यंत पोहोचणे हळूहळू कमी झाले. १९७० नंतर काँग्रेस पक्ष हा महाराष्ट्रातील नेतृत्वासाठी व्यक्तिगत आशा-आकांक्षापूर्णत्वास नेणारा राजमार्ग बनला. काँग्रेस पक्षामध्ये पक्षहितापेक्षा वैयक्तिक स्वार्थाला महत्व प्राप्त झाले.सामुहिक हितापेक्षा व्यक्तिगत हितसंबंधांचे प्रस्थकाँग्रेस पक्षात वाढले. काँग्रेस पक्षाच्या तात्विक विचारसरणीपेक्षा सत्तेच्या रोखठोख व्यवहाराला महत्त्व प्राप्त झाले.

## काँग्रेस पक्षामधील गटबाजीव पुरोगामी लोकशाही दल :

आणीबाणीच्या काळात काँग्रेस पक्षाच्या नेतृत्वामधील गटबाजी मोठ्या प्रमाणात वाढून महाराष्ट्रातील काँग्रेस पक्षात प्रथमच फूट पडली. याचा परिणाम म्हणून १९७७ च्या लोकसभा निवडणुकीमध्ये महाराष्ट्रात काँग्रेस पक्षाने सपाटून मार खाल्ला. काँग्रेस पक्षाला केवळ २० जागा जिंकता आल्या. विरोधी पक्षांनीसमविचारी पक्षांची जुळवाजुळव करून केंद्रामध्ये जनता पक्षाचे सरकार स्थापन केले. यावेळी पाटबंधारे मंत्री वसंतदादा पाटील यांना मंत्रिमंडळातून बाहेत जावे लागले.महाराष्ट्रात काँग्रेसअंतर्गत गटबाजी आधीही होती परंतु ती पक्षीय पातळीवरच नियंत्रित केली जात असे. यावेळी मात्र ही गटबाजी काँग्रेस पक्षाच्या नेतृत्वाला रोखता आली नाही. १९७८ च्या अखेरीस बंगळुरूच्या वार्षिक अधिवेशनात काँग्रेस पक्षामध्ये राष्ट्रीय पातळीवर फूट पडून पक्षाचे दोन भाग झाले ते म्हणजे काँग्रेस (इंदिरा) आणि काँग्रेस (उर्स). काँग्रेस उर्समध्ये सहभागी झालेले महत्त्वाचे नेते देवराज उर्स कासू ब्रह्मानंद रेड्डी ए.के. अँटनी, शरद पवार आणि यशवंतराव चव्हाणहे होते. दुसरीकडे इंदिरा गांधींनी काँग्रेस(इंदिरा) नावाचा स्वतःचा पक्ष स्थापन केला ज्यात शंकर दयाळ शर्मा, उमाशंकर दीक्षित, कमरुद्दीन अली अहमद, श्री सी. सुब्रमण्यम, बॅरिस्टर ए.आर. अंतुले गुलाबराव पाटील आदी नेत्यांचा सहभाग होता.इंदिरा गांधींशी फारकत घेण्याचा निर्णय घेतल्याने यशवंतराव चव्हाण यांच्या राजकीय कारकिर्दीला मोठा धक्काबसला. काँग्रेस (उर्स) विघटित झाली आणि देवराज उर्स स्वतः जनता पक्षात सामील झाले आणि काँग्रेस (उर्स) चे भारतीय काँग्रेस (समाजवादी) असे नामकरण झाले.१९७८-७९ मध्ये, यशवंतराव चव्हाण यांनी काँग्रेस सोडली आणि देवराज उर्स कासू ब्रह्मानंद रेड्डी ए.के. अँटनी यांनी शरद पवार आदींसह काँग्रेस (उर्स) मध्ये प्रवेश केला. पंतप्रधान चौधरी चरण सिंह यांच्या मंत्रिमंडळात त्यांची भारताचे गृहमंत्री आणि उपपंतप्रधान म्हणून नियुक्ती करण्यात आली.

१९८० मध्येलोकसभा निवडणुकीतील विजयानंतर इंदिरा गांधींचे सत्तेत पुनरागमनझाले.इंदिरा गांधी केंद्रात सत्तेवर आल्यानंतर नऊ राज्यांतीलविरोधी पक्षांची सरकार बरखास्त केली. त्यात महाराष्ट्रातील शरद पवार यांचेही पुरोगामी लोकशाही दलाचेसरकार बरखास्त केले. महाराष्ट्रासह अरुणाचल प्रदेश, गोवा, केरळ, पंजाब, तामिळनाडू, ओरिसा, मध्य प्रदेश आणि राजस्थान या नऊ राज्यांत त्यांनीनव्याने निवडणुका घेतल्या. ९ जून १९८० रोजी महाराष्ट्रामध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत इंदिरा काँग्रेस पक्षाच्या १८६ जागा तर शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील एस. काँग्रेस पक्षाच्या ४७ जागा निवडून आल्या. भारतीय जनता पक्षाचे १४ आमदार, शेतकरी जनता पक्षाचे ९ आमदार, धर्मनिरपेक्ष जनता पक्षाचे १७ आमदार निवडून आले. या निवडणुकीत काँग्रेस पक्षामधील बंडखोर उमेदवारांना मतदारांनी

नाकारले. केवळ १० बंडखोर या निवडणुकीत निवडून आले बॅरिस्टर अब्दुल रेहमानअंतुले हे महाराष्ट्राचे नवे मुख्यमंत्री झाले शरद पवारविधानसभेतील प्रमुख विरोधी पक्षनेते झाले. मराठवाड्यातील विलासराव देशमुख, रजनी सातव व श्रीकांत जिचकार या नवीन नेत्यांना मुखमंत्री अब्दुल रेहमान अंतुले यांच्या मंत्रीमंडळात स्थान मिळाले. या परिस्थितीत"इंदिरा गांधींच्या नेतृत्वाशी जुळवून घेतच महाराष्ट्रातील राजकारण करावे लागेल, हे येथील काँग्रेसमधीलमराठा समाजाच्या नेत्यांनी जाणले आणि यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील इत्यादींनी पुन्हा काँग्रेस पक्षात प्रवेश केला."

## १९९० नंतरची काँग्रेस पक्षामधील गटबाजी आणि दुफळीवाद:

महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर सुरुवातीच्या काळात काँग्रेस नेतृत्वाने विकसित केलेले काँग्रेस पक्ष संघटनेचे सर्वसमावेशक स्वरूप १९९० नंतर कायम राहिले नाही. १९८९ नंतर काँग्रेस पक्षाच्या अधोगतीस सुरुवात झाली. तीस वर्षानंतर काँग्रेस पक्षामध्ये मोठ्या प्रमाणात गटबाजी निर्माण झाली. महाराष्ट्राच्या राजकारणात जात, धर्म, प्रादेशिकता, आरक्षणाचा संघर्ष, ग्रामीण शहरी संघर्ष, या घटकांचा प्रभाव वाढला त्यामुळे काँग्रेस पक्षातील गटबाजीही वाढली. काँग्रेस पक्षामध्ये एखादे पद किंवा उमेदवारी मिळाली नाही की काँग्रेस पक्षाचे नेते आपल्या गटाच्या कार्यकर्त्यांना घेऊन इतर पक्षात जाऊ लागले. काँग्रेस पक्ष आपल्या विचारसरणीपासून दूर जाऊ लागला धर्मनिरपेक्षता, संमिश्र राष्ट्रवाद, सामाजिक न्याय, समता, समाजवाद यासारखी लोकशाही मुल्ये पक्षाच्या जाहीरनाम्यातून नाहीशी झाली १९९० नंतर काँग्रेस पक्षाने काँग्रेस पक्ष धर्मनिरपेक्ष आहे म्हणजे नेमके काय? याचा अर्थ लोकांना कधीच समजावून सांगितला नाही काँग्रेस पक्षाची राष्ट्राची कल्पना काय आहे? भारतीय जनता पक्षाच्या जमातवादाचा भारतातील लोकशाहीला कोणता धोका आहे? हे देखील सांगितले नाही. काँग्रेस पक्षाचे आमदार-खासदार, स्थानिक स्वराज्य संस्थेतील पदाधिकारी व सदस्य आणि पक्षाच्या संघटनेत काम करणारे नेते व पदाधिकारी यांना याबद्दल कधीही प्रशिक्षण दिलेले दिसून येत नाही. तसेच सामान्य लोकांमध्ये हे मुद्दे कधीही चर्चिले गेले नाहीतवरील मुद्दे जाणून घेणे आणि त्यानुसार आपल्या पक्षाची राजकीय जडणघडण करणे १९९० नंतर पक्ष नेतृत्वाला कधीही आवश्यक वाटले नाही काँग्रेस पक्षाचे बहुसंख्य नेते व कार्यकर्ते यांच्या दृष्टीने काँग्रेस पक्ष म्हणजे सत्ता मिळविण्याचे साधन बनले. काँग्रेस पक्षात राहून जेंव्हा सत्ता मिळणे शक्य झाले नाही त्यावेळी सत्ता मिळविण्यासाठी इतर पक्षात जाण्याचा मार्ग अनेक नेत्यांनी निवडलेला दिसून येतो काँग्रेस पक्षाची वैचारिक ओळख काहीच न उरल्यामुळे इतर पक्षात जाताना कोणत्याच राजकीय नेतृत्वाला कधीही संकोच वाटला नाही

१९९० पूर्वी काँग्रेस पक्षाने महाराष्ट्राच्या राजकारणात यशस्वी होण्यासाठी विकास कार्यक्रम, सामाजिक पाठिंबा आणि वैचारिक दिशा यांच्या आधारे आपली विशिष्ट ओळख घडवलेली होती. पण १९९० नंतर काँग्रेस पक्षाने आपली ही ओळख घडविण्यासाठी किंवा टिकविण्यासाठी कोणतेच प्रयत्न केलेले दिसून येत नाहीत. परिणामी पक्षातील गटबाजीमुळे पक्षाची अधोगती झालेली दिसून येते. काँग्रेस पक्षासमोरील दुसरा प्रश्न राजकीय सत्ता आणि पदांच्या वाटपात समतोल राखण्याचा आहे राजकीय सत्ता व पदे सर्वच राजकारण्यांना हवी असतात. परंतु काँग्रेस पक्षाच्या नेतृत्वाला राजकीय सत्ता व पदांचे वाटप करताना समतोल राखता आलेला नाही१९९० नंतर काँग्रेस पक्षाला शक्य तेवढ्या जणांना सत्तेतील पदे वाटून देणे, सत्तेचे पाणी साचून न राहता प्रवाही ठेवणे, पक्षातील यशस्वी ठरलेल्या जुने नेतृत्व व नवे नेतृत्व यांच्यात संवाद व समन्वय ठेवणे कधीच जमले नाही. जुने नेतृत्व पक्षात मांडी ठोकून एका जागी बसून राहिले त्यामुळे सत्तेचे वाटप करण्यामध्ये काँग्रेस पक्षाला मर्यादा आल्या. काँग्रेस नेतृत्वास जुन्या लोकांना सांभाळताना नव्या लोकांना सत्तापदे देता आली नाहीत नवीन व जुन्या लोकांची सांगड घालण्याचे कौशल्य केंद्रीय व राज्यातील नेतृत्वाकडे व काँग्रेस पक्ष संघटनेकडे राहिले नसल्याचे दिसून येते. जुन्या लोकांनी नव्यांना संधी द्यायची म्हणून आपल्याच मुलांना पुढे आणल्यामुळे काँग्रेस पक्षापुढे आणखी एक घराणेशाहीचे नवे संकट निर्माण झालेले दिसून येते जे जेष्ठ आहेत त्यांचे महत्व कमी न करता, त्यांना अवमानित न करता नव्या लोकांना संधी कशी द्यायची हा काँग्रेस पक्षापुढील आणखी नवीन प्रश्न आहे. जुने नेतृत्व व नवे नेतृत्व यांच्यामध्ये एक खूप मोठ्या प्रमाणात वैचारिक दरी निर्माण झाल्याचे दिसून येते. या वैचारिक दरीचे रुपांतर मतभेदामध्ये होऊन काँग्रेस पक्षामध्ये गटबाजी निर्माण झालेली दिसून येते. १९९० नंतर काँग्रेस पक्षासमोरचा तिसरा प्रश्न बंडखोरी रोखण्याचा आहे. पक्षामध्ये गटबाजी वाढल्यामुळे मोठ्या प्रमाणात बंडखोरी झाल्याचे दिसून येते बंडखोरीमुळे काँग्रेस पक्ष संघटनेमध्ये एक प्रकारचा विस्कळीतपणा आलेला दिसून येतो. बंडखोरीच्या पुढे जाऊन काँग्रेसपक्षाने भविष्याचा विचार केला नाही. काँग्रेस पक्ष नेतृत्वास पक्षामध्ये असणारे विविध गट तसेच जुने नेतृत्व व नवे नेतृत्व यांच्यामध्ये सांगड घालता आली नाही. ही सांगड घालता न आल्यामुळे बंडाचे निशाण फडकताना दिसून येते जेंव्हा काँग्रेस पक्षाकडे एकहाती सत्ता होती तसेच प्रतिपक्ष फार ताकदीचे नसल्यामुळे काँग्रेस पक्षाचा एकंदर महाराष्ट्राच्या राजकारणात दबदबा होता तेव्हा बंडखोरीचा प्रश्न हाताळणे पक्षाला सोपे गेले. पण १९९० नंतर काँग्रेस पक्षाला एकहाती सत्ता मिळविता न आल्यामुळे व इतर पक्षही ताकदवान बनल्यामुळे काँग्रेस पक्षास बंडखोरी रोखणे

अवघड गेले. अशा वेळी काँग्रेस नेतृत्वाची कसोटी लागली. गांधी घराण्यावर महाराष्ट्रातील सर्व काँग्रेसवाल्यांनी भिस्त ठेवली, याचे कारण त्यांच्या मते सोनिया-राहुल-प्रियांका या त्रिकुटाने केलेले सत्तावाटप सर्वांना मान्य होऊ शकेल. पण पक्ष नेतृत्वाकडून अशी अपेक्षा धरण्यासाठी पक्षात नेतृत्वाचा प्रश्न आधी निकाली काढणे गरजेचेहोते.

### काँग्रेस नेतृत्व आणि पक्षातील गटबाजी:

१९९० नंतर काँग्रेस पक्षामध्ये केंद्रामध्ये तसेच महाराष्ट्र काँग्रेसमध्ये नेतृत्वाची पोकळी निर्माण झालेली दिसून येते. राष्ट्रीय पातळीवर राजीव गांधी यांच्या काळापासून काँग्रेस पक्षात केंद्रीय नेतृत्वाची पोकळी निर्माण झाल्याचे दिसून येते. काँग्रेस नेतृत्वातील गटबाजी रोखण्यासाठी मध्यस्थ म्हणून किंवा पक्षातील इच्छुक नेते/ गट यांच्यामधील विश्वसनीय 'लवाद' म्हणून असलेली स्वीकार्यता मर्यादित राहिलेली दिसून येते. राजीव गांधी यांच्यामागे कुटुंबाची पुण्याई असल्यामुळे सुरुवातीला काही काळ ते काँग्रेस पक्षाला मजबूत नेतृत्व देऊ शकले. नरसिंह राव-सीताराम केसरी यांना ते शक्य झाले नाही आणि त्यामुळे पक्षाची अनेक शकले झाली. सोनिया गांधीं यांच्या नेतृत्वाच्या काळात एक निर्विवाद सत्ताकेंद्र म्हणून त्यांची स्वीकार्यता होती खरी; पण प्रत्यक्षात ठिकठिकाणच्या स्थानिक सत्तासमतोलात फार हस्तक्षेप न करण्याचे आणि प्रतिस्पर्धी गटांना एका अनामिक, अदृश्य आणि जनतेशी काही संपर्क नसलेल्या हायकमांडच्या आडून हाताळण्याचे धोरण त्यांनी सांभाळले. दहा वर्षे पक्ष सत्तेवर राहिल्यामुळे त्यांच्या मध्यस्थपणाला आयताच भारदस्तपणा आला. पण पराभवानंतर हा भारदस्तपणा ओसरला आणि मुख्य म्हणजे तो दबदबा राहुल गांधी यांच्याकडे संक्रमित करण्यात त्यांना अपयश आले. राहुल गांधी यांनी आपण तडजोडीचे उमेदवार आहोत असे न मानता काँग्रेसचे सर्व घटक आपला अधिकार मानतीलच असे गृहीत धरले. त्यांना नामधारी पक्षप्रमुख राहायचे नव्हते. जुना पक्ष, जुने नेते, वगैरेंना त्यांनी बाजूला ठेवले खरे; पण नवा पक्ष, नवे नेते आणि नवी दिशा निर्माण करण्यात ते कमी पडले. कुटुंबाच्या पार्श्वभूमीमुळे मिळालेला, पक्ष 'चालवण्याचा' अधिकार त्यांनी खरोखरीच पक्ष चालवण्यासाठी वापरायचे ठरवले आणि त्यात त्यांना अपयश आले. मध्यस्थ म्हणून किंवा पक्षाचे अंतिम नेते म्हणून त्यांना सर्वांकडून मान्यता मिळाली नाही. त्यामुळेच सिंधिया-पायलटांसारखी प्रकरणे घडतात, तेव्हा राहुल गांधींचे नेतृत्व कामी येत नाही. काँग्रेसवाल्यांना एक आकर्षक कवच म्हणून राहुल गांधी (किंवा प्रियांका-सोनिया) हवे असतात, पण त्यांचे नैतिक-राजकीय अधिकार मान्य नसतात! त्यातून आता तर गेले वर्षभर काँग्रेसला फक्त हंगामी अध्यक्ष आहेत. राहुल गांधी 'जणू काही' अध्यक्ष म्हणून विद्वानांशी चर्चा वगैरे करतात, तर प्रियांका यांचे प्रस्थ वाढले आहे, पण त्या नक्की काय भूमिका बजावणार हे गुलदस्त्यात आहे. अशा त्रिशंकू नेतृत्वाच्या आंधळ्या तिठ्यावर काँग्रेस सध्या फसलेली आहे. काँग्रेसमधील बंडखोरीची ही परिस्थिती लक्षात घेता, अनेक गटांमध्ये निर्माण सुंदोपसुंदी काँग्रेस पक्षास भेडसावणारी आहे. पराभव आणि नेतृत्वाची पोकळी यांतून निर्माण झालेली ही अनियंत्रित अंदाधुंदी आहे. १९९० नंतर निर्माण झालेली ही अवस्था पक्षाने लवकर संपवली नाही, तर पक्षाची अनेक शकले होतील आणि पक्ष आतून आणखी-आणखी पोकळ बनत जाईल. काँग्रेस पक्षाचे अस्तित्व राष्ट्रीय स्तरावर उरणार नाही.

### १९९५ ची विधानसभा निवडणूक व काँग्रेस पक्षातील गटबाजी :

१९९० च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीतकाँग्रेस पक्षाचा बालेकिल्ला पक्षांतर्गत गटबाजीमुळे ढासळला. राज्यातील काँग्रेस नेतृत्वाला सरकार स्थापन करण्यासाठी अपक्षांची मदत घ्यावी लागली. १९९० ते १९९५ या काळात काँग्रेस पक्षांतर्गत गटबाजी मोठ्या प्रमाणात वाढली. सुधाकरराव नाईक व शरद पवार यांचे दोन गट पक्षात कार्यरत असलेले दिसून येतात. या गटबाजीमुळे काँग्रेस पक्षाचा ऱ्हास होण्यास सुरुवात झाली. केंद्रातील पक्षाध्यक्ष सिताराम केसरी यांचे निष्क्रिय नेतृत्व, पक्षांतर्गत गटबाजी, आणि काँग्रेस पक्षामध्ये नवख्या असलेल्या सोनिया गांधी यामुळे काँग्रेस पक्षाच्या नेतृत्वामध्ये मोठ्या प्रमाणात संघर्ष सुरु झाला. याच काळात महाराष्ट्रात अंतर्गत गटबाजीच्या राजकारणामुळे काँग्रेस पक्षाची प्रतिमा मोठ्या प्रमाणात ढासळली. मुंबईतील बॉम्बस्फोट, हिंदू-मुस्लीम दंगल, भ्रष्टाचार इत्यादी कारणांमुळे १९९३ मध्ये सुधाकरराव नाईक यांना हटवून शरद पवार यांना महाराष्ट्राचे मुख्यमंत्री करण्यात आले. याच काळात सुधाकरराव नाईक व शरद पवार या दोन नेत्यांमध्ये मोठ्या प्रमाणात सुप्त संघर्ष निर्माण झाल्याचे दिसून येते. १९९५ च्या विधानसभा निवडणुकीवेळी काँग्रेस पक्षासाठी वातावरण खूप प्रतिकूल बनले. एकापाठोपाठ एक मुख्यमंत्री बदलण्याचा काँग्रेसश्रेष्ठींचा खेळ, काँग्रेस पक्षामधील कधीही न संपणारी गटबाजी आणि मुख्यमंत्रीपद मिळवण्यासाठी राज्यातील नेत्यांचे हपापलेपण हा सारा प्रकार राज्यातील जनतेला इतका असह्य झाला की यावेळी लोकांनी काँग्रेस पक्षाचा दारुण पराभव केला.महाराष्ट्रातील २०० बंडखोर काँग्रेस नेत्यांनी अधिकृत काँग्रेस उमेद्वारांविरोधातबंडखोरी केली. ही बंडखोरीच काँग्रेस पक्षाला सत्तेवरून दूर करण्यास कारणीभूत ठरली. शिवसेना व भारतीय जनता पक्षाचा

प्रचार प्रामुख्याने महाराष्ट्रातील वाढती गुन्हेगारी भ्रष्टाचार व हिंदुत्वाच्यामुद्द्यांभोवतीकेंद्रित झालेला होता. गोपीनाथ मुंढे व बाळासाहेब ठाकरे मतदारांना शिवशाही आणण्याचे आवाहन करीत होते. बाळासाहेब ठाकरे यांच्या सभांना महाराष्ट्रात अभूतपूर्व प्रतिसाद मिळत होता. १९९५ च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाला सर्वाधिक ८० जागा, शिवसेनेला ७३ जागा तर भारतीय जनता पक्षाला ६५ जागा मिळाल्या. जनता दल ११ जागा, शेकाप ६ जागा, माकप ३ जागा, समाजवादी पार्टी ३ जागा, विदर्भ आंदोलन समिती १ जागा,महाराष्ट्र विकास काँग्रेस १ जागा मिळाल्या. काँग्रेस बंडखोरांमुळेअनेक ठिकाणी काँग्रेस पक्षाच्या अधिकृत उमेदवारांचा पराभव झालागटबाजी व बंडखोरी यामुळे काँग्रेस पक्षाच्या जागा पहिल्यांदाच १०० च्या आत निवडून आल्या. या निवडणुकीत शरद पवार यांचे नेतृत्व मानणारे४५ बंडखोर आमदार निवडून आले.काँग्रेस पक्षाचा पराभव करण्यासाठी कोणत्याही विरोधी पक्षाची गरज नाही तर काँग्रेस पक्षच काँग्रेस पक्षाचा पराभव करू शकतो अशा प्रकारची चर्चा प्रसारमाध्यमांनी केली. काँग्रेस पक्षाला सर्वाधिक ८० जागा मिळाल्या असल्या तरी बहुमतापासून काँग्रेस पक्ष खूपच दूर होता. शिवसेना-भारतीय जनता पक्ष युतीने अनुक्रमे ७३ व ६५ जागा मिळाल्या. शिवसेना-भारतीय जनता पक्ष युतीला एकूण १३८ जागा व २९.२ टक्के मते मिळाली. शिवसेना-भारतीय जनता पक्ष युतीला सरकार स्थापन करण्यासाठी ७ जागा कमी पडल्या. आपल्या सहकारी संस्था धोक्यात येऊ नयेत म्हणून काँग्रेस बंडखोरांनीमहाराष्ट्र विकास आघाडी' या नावाने स्वतंत्र गट स्थापन करून शिवसेना-भारतीय जनता पक्ष युतीला पाठिंबा दिला. अपक्ष आणि बंडखोरांच्या मदतीने शिवसेना-भारतीय जनता पक्ष युतीने महाराष्ट्रात पहिले बिगरकाँग्रेस सरकार स्थापन केले. काँग्रेसला पाठिंबा देणारा पारंपरिक मतदार युतीकडे वळलेला दिसतो या निवडणुकीत पक्षातील गटबाजीमुळे काँग्रेस पक्षाला विरोधी बाकावर बसावे लागले.

## काँग्रेस पक्षातील गटबाजी व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना :

वसंतदादा पाटील यांच्या काळात शरद पवार यांनी तत्कालीन सरकारमधून बाहेर पडून पुरोगामी लोकशाही दलाचे नवे सरकार स्थापन केले होते. त्यावेळी शरद पवार यांनी सरकारमधील ४० आमदार फोडत सर्वांनाच धक्का दिला होता. पुलोद सरकारची स्थापना करून शरद पवार वयाच्या ३८व्या वर्षी राज्याचे मुख्यमंत्री झाले. पुलोद सरकार पडल्यानंतर शरद पवार हे पुन्हा काँग्रेस पक्षामध्ये सामील झाले. त्यानंतरची काही वर्षे महाराष्ट्रात काँग्रेस पक्षाचे स्थिर राजकारण सुरु राहिले. परंतु, राजीव गांधी यांच्या मृत्यूनंतरसोनिया गांधी यांच्याकडे काँग्रेस पक्षाची सूत्रे गेल्याने पंतप्रधानपदाच्या शर्यतीमधील प्रबळ दावेदार मानले जाणारे शरद पवार यांची राजकीय महत्त्वाकांक्षा पुन्हा जागृत झाली. शरद पवार यांनी काँग्रेस पक्षाचा अध्यक्ष विदेशी व्यक्ती असता कामा नये, अशी भूमिका घेत थेट सोनिया गांधी यांच्या नेतृत्वाला आव्हान दिले. सोनिया गांधी यांच्यामुळे शरद पवार यांच्या राजकीय वाटा बंद होणार होत्या हेजसे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या स्थापनेच्या पाठीमागचे राजकीय कारण होतेत्याप्रमाणे महाराष्ट्रातील काँग्रेसअंतर्गत गटबाजी हेदेखील एक महत्वाचे कारण होते. घराणेशाहीतून लादले गेलेले सोनिया गांधींचे नेतृत्व स्वीकारण्यापेक्षा महाराष्ट्रातीलराजकीय नेते व जनता शरद पवार यांच्यासारखे अनुभवी नेतृत्व स्वीकारतील, असा एक अंदाज त्यामागे होता. याचा परिणाम शरद पवार आणि त्यांचे दोन सहकारी तारिक अन्वर आणि पीए संगमा यांना पक्षातून काढून टाकण्यात आले.त्यानंतर १० जून १९९९ मध्ये मुंबईच्या षण्मुखानंद सभागृहातशरद पवार यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना करण्यात आली. १९९९ मध्ये शरद पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा स्वतंत्र पक्ष स्थापन केल्याने राज्यातील काँग्रेसच्या वाटचालीवर या फुटीचे दूरगामी परिणाम झालेले दिसून येतात.१९९९ च्या फुटीनंतर काँग्रेसचे विधानसभेतील ४५ आमदार व विधानपरिषदेतील १५ आमदार राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये गेले. लोकसभेतील ११ खासदार राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये गेले. या फुटीमुळे काँग्रेस पक्षाचे खूप मोठे नुकसान झाले. काँग्रेस पक्षाचे वर्चस्व असणाऱ्या महाराष्ट्रातील सहकार क्षेत्रातील महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना महासंघ व महाराष्ट्र राज्य बँक या दोन अग्रगण्य संस्था राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या ताब्यात गेल्या. तसेच काँग्रेस पक्षाचे महाराष्ट्रातील जिल्हा परिषद, पंचायत समिती, महानगरपालिका, नगरपरिषद या संस्थांमधील बरेचसेशरदपवार समर्थक सभासद राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये गेले. मुंबईमधील राष्ट्रीय मिल मजदूर संघानेही काँग्रेस पक्षाऐवजी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला पाठिंबा दिला. पश्चिम महाराष्ट्र पूर्वीपासून काँग्रेस पक्षाचा बालेकिल्ला मानला जात होता. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या स्थापनेमुळे या बालेकिल्ल्यातील काँग्रेस पक्षाची ताकद दोन गटात विभागली गेली. एक गट राष्ट्रवादी काँग्रेसबरोबर तर दुसरा गट काँग्रेस पक्षाबरोबर गेला. उत्तर महाराष्ट्रातही काँग्रेस पक्षामधील एक गट राष्ट्रवादी काँग्रेसबरोबर गेला. सहकारी क्षेत्राची देखील विभागणी दोन गटामध्ये झाली. मराठवाड्यातील औरंगाबाद, उस्मानाबाद, जालना, परभणी व बीड इत्यादी जिल्ह्यातील काँग्रेसचे कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात गेले. विदर्भातील नागपूर, अमरावती, चंद्रपूर, अकोला, वर्धा, बुलढाणा, यवतमाळ, भंडारा, गोंदिया, वाशिम, गडचिरोली या जिल्ह्यातील काही नेतेसोडले तर सामान्य कार्यकर्ते मात्र काँग्रेस पक्षामध्येच राहिले. कोकणातील काँग्रेसमधील शरद पवार समर्थक नेत्यांचा एक गट राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये

गेला. भारतीय जनता पक्षातील काही नेते राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये गेले.शिवसेना या पक्षामधील नेते व कार्यकर्त्यांमधून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला फारसा प्रतिसाद मिळाला नाही. शिवसेनेतील नाराज मराठा कार्यकर्ते मात्र राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये आले. तसेच गणेश नाईक, सुरेशदादा जैन यांच्यासारखे बिगरशेतीक्षेत्रातील परंतु स्थानिक राजकारणावर वर्चस्व असणारे काही **ते** राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये गेले. राज्यातील इतर मागासवर्गीयांचे संघटन महात्मा फुले समता परिषदेमार्फत करणारे छगन भुजबळ यासारखे ओ.बी.सी. समाजातील नेतेही राष्ट्रवादीत गेले. निवडणुका असल्याने ज्यांना काँग्रेसमध्ये तिकीट मिळणार नाही, असे काँग्रेसचे सर्व नेते राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये गेले. जुना समाजवादी काँग्रेस पक्षच राष्ट्रवादी काँग्रेस झाला.एक अर्थानेमराठा समाजाची ऐतिहासिक वाटचाल, सत्ताकांक्षा, धुरीणत्व आणि त्याला मिळालेली आव्हाने यांची पार्श्वभूमी राष्ट्रवादी काँग्रेसच्या उदयाला व वाटचालीला लाभली होती. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या स्थापनेने काँग्रेस पक्षाचे अपरिमित असे नुकसान झाले.

## निष्कर्ष:

१९९० नंतर महाराष्ट्रातील काँग्रेस पक्ष संघटनेत अनेक स्थित्यंतरे घडून आली आणि त्यामुळे काँग्रेस पक्षाला पराभवाला सामोरे जावे लागले. यशवंतराव चव्हाण यांनी काँग्रेसपक्षामध्ये बेरजेचे राजकारण करण्यावर भर दिला होता. महाराष्ट्राच्या विकासाच्या प्रक्रियेत विविध समाजघटकांना स्थान देण्याचा प्रयत्न केला. काँग्रेस पक्ष संघटनेमध्येदेखील सर्व समाजघटकांना प्रतिनिधित्व मिळेल याची खबरदारी घेतली. यशवंतराव चव्हाण केंद्रामध्ये गेल्यानंतर काँग्रेस पक्षांतर्गत गटबाजीस सुरुवात झाली १९६९ मधील राष्ट्रीय पातळीवरील काँग्रेस पक्ष संघटनेतील फूटीचा परिणाम म्हणून महाराष्ट्रातील काँग्रेस संघटनेत फूट पडली १९७० च्या दशकात केंद्रीय नेतृत्वाने महाराष्ट्रातील काँग्रेस पक्ष संघटनेत मोठ्या प्रमाणात हस्तक्षेप करण्यास सुरुवात केली. महाराष्ट्रातील सत्ता चौकट बदलण्याचे प्रयत्न केले. याचा परिणाम काँग्रेस पक्षाच्या संघटनेत शिखरापासून पायापर्यंत मोठा बदल घडून आला मराठा नेतृत्वाचे खच्चीकरण खूप मोठ्या प्रमाणात झाले परिणामी मराठा नेतृत्वात अंतर्गत स्पर्धा सुरुझाली. १९७८ मध्ये काँग्रेस पक्षांच्या संघटनेअंतर्गत गटबाजीला ऊत येऊन काँग्रेस पक्षात प्रथमच उघडपणे फूट पडली. याचा परिणाम म्हणून १९७८ च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाला पराभवाला सामोरे जावे लागले. पुढे काँग्रेसअंतर्गत गटबाजी वाढतच गेली.या गटबाजीचा परिणाम होऊन काँग्रेस पक्ष संघटना दुबळी बनली केंद्रीय नेतृत्वाने महाराष्ट्रावर मुख्यमंत्री लादल्याने महाराष्ट्रातील नेतृत्व, संघटना व मतदारांमध्ये एक प्रकारची अस्वस्थता निर्माण झाली. १९९९ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या स्थापनेने काँग्रेस पक्षामेध्ये उभी फूट पडली व काँग्रेस पक्षाचे अपरिमित नुकसान झाले. काँग्रेस पक्षाचा मतदार दोन पक्षांत विभागला गेल्यामुळे काँग्रेस पक्ष दुबळा होऊन मतांची टक्केवारी व जागा खूपच कमी झाल्याकाँग्रेस पक्षातील नवीन नेतृत्वाची विकास प्रक्रिया, जनाधार कायम ठेवणे, पक्ष संघटना नव्याने बांधणे तसेच पक्ष धोरणाची दिशा ठरविणे या गोष्टींकडे काँग्रेस पक्षाचे दुर्लक्ष झाले काँग्रेस पक्षातील गटबाजीमुळे १९९० नंतर काँग्रेस पक्षाचा मोठ्या प्रमाणात ऱ्हास झाल्याचे दिसून येते

## संदर्भसूची :


१. पळशीकर सुहास, कुलकर्णी सुहास, **'महाराष्ट्रातील सत्तासंघर्ष : राजकीय पक्षांची वाटचाल'**, फेब्रुवारी २००७, समकालीन प्रकाशन, पुणे
२. चौसाळकर अशोक, **'महाराष्ट्र काँग्रेसचे ऱ्हासपर्व', 'महाराष्ट्राचे राजकारण : नवे संदर्भ'** (संपादक : चोरमारे विजय), नवता प्रकाशन, मुंबई, मार्च, २०१४
३. राजेश्वरी देशपांडे **'काँग्रेस पक्ष'** (संपा : सुहास पळशीकर, सुहास कुलकर्णी) **'महाराष्ट्रातील सत्तासंघर्ष : राजकीय पक्षाची वाटचाल'**, समकालीन प्रकाशन, पुणे, २००८
४. बिरमल नितीन, **'प्रबळ जातीचा प्रादेशिक पक्ष : राष्ट्रवादी काँग्रेस'** समाजप्रबोधन पत्रिका, पुणे, ऑक्टोबर-डिसेंबर १९९९
५. राजेश्वरी देशपांडे, **'काँग्रेस पक्ष'** (संपादक : सुहास पळशीकर, सुहास कुलकर्णी) **'महाराष्ट्रातील सत्तासंघर्ष : राजकीय पक्षाची वाटचाल'**, समकालीन प्रकाशन, पुणे, २००८
६. राजेश्वरी देशपांडे, **'काँग्रेस पक्ष'** (संपादक : सुहास पळशीकर, सुहास कुलकर्णी) **'महाराष्ट्रातील सत्तासंघर्ष : राजकीय पक्षाची वाटचाल'**, समकालीन प्रकाशन, पुणे, २००८
७. राजेश्वरी देशपांडे, **'काँग्रेस पक्ष'** (संपादक : सुहास पळशीकर, सुहास कुलकर्णी) **'महाराष्ट्रातील सत्तासंघर्ष : राजकीय पक्षाची वाटचाल'**, समकालीन प्रकाशन, पुणे, २००८

८. राजेश्वरी देशपांडे **'कॉंग्रेस पक्ष'** (संपादक : सुहास पळशीकर, सुहास कुलकर्णी) **'महाराष्ट्रातील सत्तासंघर्ष : राजकीय पक्षाची वाटचाल'**, समकालीन प्रकाशन, पुणे, २००८
९. राजेश्वरी देशपांडे **'कॉंग्रेस पक्ष'** (संपादक : सुहास पळशीकर, सुहास कुलकर्णी) **'महाराष्ट्रातील सत्तासंघर्ष : राजकीय पक्षाची वाटचाल'**, समकालीन प्रकाशन, पुणे, २००८
१०. बिरमल नितीन, **'राष्ट्रवादी कॉंग्रेस'** (संपादक : पळशीकर सुहास व कुलकर्णी सुहास) **'महाराष्ट्रातील सत्तासंघर्ष : राजकीय पक्षांची वाटचाल'**, समकालीन प्रकाशन, पुणे, फेब्रुवारी २००७
११. बिरमल नितीन, **'राष्ट्रवादी कॉंग्रेस'** (संपादक : पळशीकर सुहास व कुलकर्णी सुहास) **'महाराष्ट्रातील सत्तासंघर्ष : राजकीय पक्षांची वाटचाल'**, समकालीन प्रकाशन, पुणे , फेब्रुवारी २००७
१२. चोरमारे विजय, **'महाराष्ट्राचे राजकारण : नवे संदर्भ',**नवता प्रकाशन, मुंबई, मार्च, २०१४